## संस्काराचे महत्व (भाग - १)

मनुष्य जे कर्म करतो त्याची छाप त्याच्या आत्म्यावर संस्काराच्या रूपाने पडत असते. आत्म्याने शरीर सोडल्यावर तो स्वतःबरोबर बरे-वाईट संस्कार घेऊन जात असतो. मनुष्याच्या जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या कर्माची नोंद संस्काराच्या रूपाने होत असते. अगदी बालपणापासून प्रत्येकाला शिक्षण व शिकवण मिळत असते व त्यानुसार त्याच्यावर जे संस्कार घडविले जातात वा होत असतात त्यातून त्याच्या ठिकाणी विशिष्ट प्रकारच्या कल्पना, भावना व धारणा निर्माण होत असतात. या अंतरप्रेरणा कर्माला कारणीभूत होत असतात. अशा रीतीने माणूस विचार आणि आचार यांच्याद्वारे जी कर्मे करतो, ती निसर्ग नियमांना गतिमान म्हणजे कार्यान्वित करतात. त्यातून जी निर्मिती होते तिला नियती म्हणतात. ही नियती माणसांच्या जीवनावर प्रभाव टाकीत असते. प्रत्येकाची नियती वेगळी असून ती शुभ किंवा अशुभ असू शकते पण शुब नियती निर्माण होण्याकरीता प्रत्येकाने शुभ चिंतणे, शुभ बोलणे, शुभ इच्छा करणे आवश्यक आहे. शुभ नियती निर्मितीचा हा सोपा व सहज मार्ग आहे. माणसाने शुभचिंतन केले, शुभ विचार धारण केले, शुभ बोलण्याची सवय ठेवली आणि शुभ कर्मे करण्याचा सातत्याने प्रयत्न केला, तर सर्वसाधारण लोकांच्या जीवनात ज्या समस्या निर्माण होतात, त्या समस्यांना सामोरे जावे लागणार नाही. यदा कदाचित समस्या निर्माण झाल्याच तर त्यांना यशस्वीपणे तोंड देता येईल. विचार ही एक प्रचंड शक्ती आहे. एखाद्या धर्मशाळेत माणसे येतात आणि जातात, त्याचप्रमाणे मनरूपी धर्मशाळेत अनेक विचार येतात-राहतात आणि निघून जातात. आपण आपल्या मनात जे विचार घोळवितो ते अंर्तमनात जाऊन राहतात, तेथे मूळ धरतात व कालांतराने ते आपल्या जीवनात अनुभव, घटना व परिस्थिती या रूपात प्रकट होतात. म्हणजे आपल्या जीवनाचे शिल्पकार आपले मनच आहे. करीता मनाला सुसंस्कृत करणे, त्यावर चांगले संस्कार घडविणे हे अति आवश्यक आहे.

शुभ संस्काराचे महत्व अनन्यसाधारण आहे. लहान मुलांच्या मनावर संस्कार लवकर होतात. यास्तव बालपणीच योग्य संस्कार केले तर त्याचे भावी जीवन योग्य दिशेने वाटचाल करील यात शंका नाही. पूर्वीच्या काळी ऋषी-मुनींच्या आश्रमात मुलांना विद्यार्जनासाठी ठेवण्यात येत असे. हे आश्रम नदीतीरी निसर्गरम्य वातावरणात वसलेले असतात. एक तप म्हणजे बारा वर्षे अध्ययन चालत असे. रावापासून रंकापर्यंत सर्वांची मुले येथील पवित्र वातावरणात शिक्षण घेत. कुठेही श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेदभाव नसे. अध्ययन पूर्ण झाल्यावर सर्वांना स्वगृही जाण्याची परवानगी असे. गुरूजनांविषयी अनन्य श्रद्धा, आदरभाव, आत्मिक प्रेम, समाज सेवेचे कर्तव्य भावनेने घेतलेले व्रत, मात-पित्यांबद्दल अत्यंतिक आदर, आणि गुरूगृही मिळालेले शास्त्रोक्त ज्ञान ही शिदोरी घेऊन विद्यार्थी स्वगृही परत येत असत आणि आदर्श जीवन जगण्याचा यथोचित प्रयत्न करीत असत. पुढे ऋषी-मुनींच्या तपश्चर्येचे तेज कमी झाले. सरस्वती देवीच्या पवित्र मंदिरात स्वार्थाने, अहंमन्यतेने प्रवेश केला व तेथील पावित्र्य कलंकित केले. पक्षपात, श्रेष्ठ-कनिष्ठ भाव निर्माण झाला. तरीदेखील काही काळ तक्षक्षील-नालंदासारख्या विद्यापीठात परदेशांतील विद्यार्थी विद्याजर्नासाठी येत असत. पण आज मात्र परिस्थिती अगदी उलट आहे. भारतातील विद्यार्थी आज परदेशात जाऊन शिक्षण घेत आहेत. खूप पैसा कमवून भोग संपन्न व विलासी जीवनात रममान होत आहेत. त्यामुळे अध्यात्मिक नीतीमूल्यांकडे दुर्लक्ष होत आहे. हा काळाचा प्रभाव दिवसेंदिवस उग्ररूप धारण करीत आहे. परिणामी आपल्या अत्युच्य संस्कृतीचा, आदर्श संस्कारांचा लोप होत आहे.

आदर्श जीवन पद्धती, श्रेष्ठ ग्रंथ संपदा, श्रद्धास्थाने व सामाजिक जीवन कलीयुगात उद्ध्वस्त झाले आहे. त्याचे कारण म्हणजे काम-क्रोधादि विकारांचा मानवी जीवनावर झालेला आघात. मानवी जीवनावर आलेले हे एक महान संकट होय. अशावेळी हे गीत आठवते-

''देख तेरी संसार की हालत क्या हो गई भगवान

कितना बदल गया इंसान''

अशा अत्यंत विपरित परिस्थितीतून समाजाबाहेर काढून अध्यात्मिक व नैतिक मूल्ये पुनश्च प्रस्थापित करण्याचा प्रयत्न साधू-संतांनी केला. अध्यात्मिक संस्काराद्वारे समाजाला गतवैभव प्राप्त करून घेण्याचा, आदर्श जीवन जगण्याचा मार्ग दाखविला. मागील काही शतकापासून अशा प्रकारचे प्रयत्न-मार्गदर्शने साधुसंत करीत आलेले आहेत. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, गोरा कुंभार, नरहरी सोनार, जनाबाई इत्यादी संतांनी समाजात जनजागृती, धर्मजागृती व संस्कृती याबद्दलचा सार्थ अभिमान जागृत करण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्राबाहेरील प्रांतातून संत तुलसीदास, संत कबीर, संत मीराबाई यांसारख्या अनेक संत श्रेष्ठांनी आपल्या प्रासादिक काव्य संपदेद्वारा भक्तिमार्ग प्रशस्त केला. अगदी अलीकडील काळातील चैतन्य महाप्रभू, रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, गाडगे महाराज, योगी अरविंद, संत तुकडोजी महाराज आदी महान पुरूषांनी समाजाला अत्यंत तळमळीने मार्गदर्शन केले. (क्रमशः)

- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स

www.bkvarta.com